श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

अंक ४ वर्ष ९ ] आषाढ [ शके १८५४

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका

—शंकराचार्य.

ादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... | १–३ |
| आधुनिक पाश्चात्य शास्त्रप्रवीण विद्वान व विदुषींना प्रश्न २ रा. ... ... ... | ४–११ |
| श्री कायम फंडखातें ... ... ... ... | १२–१६ |
| भक्तमंडळखातें ... ... ... ... | १७ |
| श्री शिरडी संस्थानचा १९ वा म्हणजे शके १८५३ चा अहवाल ... ... ... | १८–२६ |
| श्री संतकथामृत ( अध्याय २ रा )... ... ... | ७–१२ |
| श्री शिरडी संस्थानचा शके १८५३ चा जमाखर्चाचा आढावा | |


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २–८–०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचें असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड,

—प्रकाशक.

[redacted]



# अनुभव

## श्रीसाईनाथ

श्री. रा. बाबासाहेब यांस कृ. सा. न. वि. वि. मी आपणांस श्रीसाईबाबांचे चमत्कार लिहून कळविण्याचें आश्वासन बरेंच वेळ दिलें; परंतु तसें आजपर्यंत घडलें नाहीं; तरी क्षमा असावी; व पुढें दिलेला मजकूर सवडी-प्रमाणें श्रीसाईलीलेंत योग्य वाटल्यास प्रसिद्ध करावा. कृपालोभ असावा हे विनंति.

आपला,

१५-६-१९३२. न. दि. फाटक.

श्रीसमर्थसाईबाबा समाधिस्थ होण्यापूर्वी कांहीं प्रेमळ भक्तांस सांगत कीं, "मी माझे समाधींतूनही तुम्हांस हांक देईन." त्याबद्दलचा माझा विलक्षण अनुभव आपणास कळवावयाचा विचार असून देखील माझ्या हातून तें घडलें नाहीं; त्याचें कारण श्रीसाईबाबांसच माहीत. मी तर एक पापी मनुष्य आहें. असो. आतां अनुभव लिहिण्यास सुरवात करितों.

इ. स. १९२१ मध्यें मी माझ्या गांवीं आजारी असल्यामुळें रजा घेऊन गेलों होतों. त्यावेळीं आमची मोठी मुलगी चि. बगुबाई ही मुंबईस सासरीं असून आजारी होती. आजार म्हणजे कफ, दमा वगैरे होतीं. आजारीपणा जास्त वाढूं लागला म्हणून तिच्या नवऱ्यानें तिला आमच्याकडे आणून पोंचविली. मी रीतीप्रमाणें औषधोपचार सुरू केला; परंतु गुण नाहीं. सर्व उपाय झाले. घरांत श्रीसमर्थ साईबाबांची तसबीर देवांपाशीं नित्य पूजेस म्हणून ठेवलेली होती. दसऱ्याचा दिवस असल्यामुळें मी जरी आजारी होतों व स्नान वगैरे करीत नसें तरी कुटुंबास नैवेद्याकरितां श्रीखंड करण्या-बद्दल सुचविलें व त्याप्रमाणें सर्वांनुमतें तें तयारही झालें. दोन प्रहरीं भोजनाच्या वेळीं मी व आमच्या वर सांगितलेल्या आजारी मुलीनें देवाचा प्रसाद म्हणूनच थोडें श्रीखंड भक्षण केलें. झालें! तोच श्रीखंडाचा प्रसाद आमच्या मुलीस सोसला नाहीं असें म्हणण्यापेक्षां तिच्या शरीरांतील रोगाचें मूळ काढण्यास कारण झाला.

त्याच रात्रीं सुमारें ९ वाजण्याच्या सुमारास मुलीस दमा जास्त झाला व जणुं शेवटची वेळ आली असें वाटून आमची मातुःश्री मला मी बाहेर झोंपलों होतों त्या ठिकाणीं हाक मारण्यास आली व म्हणाली कीं, मुलीचा प्राण जाण्याची वेळ आली आहे, तरी एक वेळ पाहावें. हें ऐकून माझा तापाचा आजार नाहींसा झाला व घरांत जाऊन पाहतों, तों मुलीनें डोळे फिरविले आहेत व १।२ मनुष्यांनीं तिला एका लोडापाशीं टेकून धरली आहे. हा सर्व प्रकार पाहून मी तर घाबरलों; परंतु वाचकहो, यावेळीं श्रीसमर्थ समाधिस्थ साईबाबा यांनीं मला जशी प्रेरणा दिली त्याप्रमाणें मी माझ्या कुटुंबास करण्यास सांगितलें. तें असें कीं, 'देवापाशीं तुपाची वात लावा व उदवत्ती-धुप करा व मी बाहेरून हात पाय धुवून येईपर्यंत घरांत जी चूल पेटलेली आहे त्यांतील विभूति श्रीसाई-बाबांच्या धुनींतील उदी आहे असें समजून देवापाशीं आणून ठेवा.' त्याप्रमाणें विलंब न लागतां सर्व झालें, व मीही हातपाय धुवून घरांत आलों व देवापाशीं उभा राहून करुण स्वरानें श्रीबाबांस हाक मारली व या प्रसंगीं या ठिकाणीं आपणच माझे देव, गुरु, वैद्य वगैरे सर्व आहांत असें सांगून मुलगी या वेळे-पासून आपल्या पदरांत दिली आहे असें सांगितलें. कारण, मरते वेळीं तरी तिला प्रभूचें स्मरण राहील. इतकी प्रार्थना करून देवांपाशीं कुटुंबानें चुलीं-तील आणलेली राख श्रीसाईबाबांच्या धुनींतील प्रत्यक्ष उदी म्हणून मुलीचे कपाळास लाविली. उदीचा स्पर्श होण्याची खोटी तोंच ज्या मुलीची वाचा बंद झाली होती तिनें प्रथम मला हाक मारली व म्हणूं लागली कीं, अहो, एक साधु आपल्या देवापाशीं उभे आहेत व मला सांगत आहेत कीं, 'तुझ्या बापानें हाक मारल्यावरून आलों आहें; आतां मी तुला मरूं देणार नाहीं.' मला किंवा त्या ठिकाणीं असलेल्या मनुष्यांस हें कांहीं दिसलें नाहीं. मी मात्र मनांत समजलों व मुलीस साधूचें वर्णन कर म्हणून सांगितलें. त्या वेळीं तिनें जें वर्णन केलें तें असें:—एक उंच बांधा असलेले साधु मस्तकास फडकें गुंडाळलें आहे, काखेंत झोळी असून हातांत एक छडी आहे व मला सांगत आहेत कीं, 'मी तुला आतां माझ्या झोळींत घेतली आहे, तरी भिण्याचें कारण नाहीं.' हें सांगण्याचें कारण असें कीं, मुलीला पिशाच्चबाधा झालेली

होती व तें पिशाच्च या वेळीं मुलीला सोडून बाहेर जाऊन तेथून भीति दाखवीत होतें.

सांगण्याचें कारण असें कीं, मुलगी त्या ठिकाणीं आलेल्या श्रीसमर्थसाईबाबा यांस सांगू लागली कीं, 'बाबा, त्या पिशाच्च्यानें माझी मान दाबली, [illegible] मी बेशुद्ध झालें; आपण आल्याबरोबर तो पळून बाहेर गेला आहे.' त्या वेळीं मी मुलीस सांगितलें कीं, हे साधु इतर कोणी नसून शिरडी येथील श्रीसाईबाबा आहेत; तरी त्यांच्या पायांवर मस्तक ठेव. त्याबरोबर अंथरुणावरूनच तिनें मस्तक श्रीबाबांच्या पायांवर ठेविलें व आम्हांस सांगू लागली कीं, 'ते साधु साईबाबा उभे आहेत तरी त्यांस आसन द्यावें.' तावडतोब देवांपाशीं आसन घात व कांहीं ग्रहण करण्याबद्दल मुलीलाच विनंति करण्यास सांगितलें. कारण, आम्हा कोणासच साधु श्रीसाईबाबा अगर तें पिशाच्च दिसत नव्हतें. श्रीसाईबाबांनीं घरांत कांहीं फळें आहेत त्यापैकीं एक द्यावें असें सांगितलें व त्याप्रमाणें तें त्या ठिकाणीं आणून ठेविलेंही. नंतर आम्हीं प्रसाद म्हणून तें खावें असें मुलीनें सांगितल्यावरून सर्वांस प्रसाद दिला. नंतर श्रीसाईबाबा मुलीस म्हणाले कीं, 'मी आतां जातों; वेळ झाली. पिशाच्चास आतां भिण्याचें कारण नाहीं.' झालें! क्षणार्धांत ते दिसेनासे झाले व मुलगीही तावडतोब बसल्या जागींच खालीं पडली व झोंपेच्या पूर्ण स्वाधीन झाली. मला या वेळीं प्रेमाश्रु आले व जो आनंद झाला तो लिहिणें शक्य नाहीं. माझ्याशिवाय श्रीसाईबाबांना माझ्या घरांतील कोणीही मनुष्यानें प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें असें असतां मुलीलाच फक्त प्रत्यक्ष दर्शन व तेंही समाधिस्थ झाल्यानंतर ३ वर्षांनीं! त्या वेळीं तेथें असलेल्या मंडळीस मोठें नवल वाटलें यांत विशेष नाहीं. आतां पुढें सवडीप्रमाणें याच चमत्काराचा राहिलेला भाग कळवीन; कारण बराच भाग अद्याप राहिलेला आहे.

# आधुनिक पाश्चात्य शास्त्रप्रवीण विद्वान व विदुषींना

## प्रश्न २ रा.

### ही देखिल एक भाकडकथा आहे काय ?

" अरे भाऊ ! माझ्याजवळ ऐशीं कला आहेत; त्यांतल्या कांहीं तुल दाखविल्या; दुसऱ्या आस्ते आस्ते तुला दाखवीन ! ! " हे व असेच दुसरे शब्द श्रीसाईबाबांनीं उच्चारिलेले अनेकांनीं ऐकले आहेत. त्यांतला एक दाखला घेऊन त्याचा विचार करूं.

मनुष्यप्राण्याचा गर्भ पूर्णावस्थेंत येईपर्यंत तो सुमारें २८० दिवस घेत असतो; ती मुदत पूर्ण झाल्याबरोबर तो जन्म घेतो आणि त्याचें स्वतंत्र बाह्य जीवन सुरू होतें.

अगदीं सुरवातीस मनुष्याच्या गर्भाच्या आकृतिची सर्व सस्तन व कृमि-कीटकादि अत्यंत नीच योनींतल्या सर्व तशाच स्थितींतल्या प्राण्यांच्या आकृतींशीं अत्यंत साम्यता दिसते. नंतर हळू हळू फरक पडून ती मत्स्याकृति दिसावयास लागते. नंतर लहान हातपायादि अवयव फुटून ती कांसवाप्रमाणें दिसू लागते. त्यानंतर त्याच्यांत व इतर सस्तन प्राण्यांच्या गर्भांतील साम्यतेंत हळू हळू फरक दिसावयास लागतो; तरी पण उंच जातींतलीं वानरें व मनुष्य-प्राणी यांच्या गर्भांत बराच वेळपर्यंत विशेष साम्यता दिसून येते. उत्क्रांति-तत्त्वाच्या विचाराप्रमाणें मनुष्यप्राण्याची वाढ अगदीं नीच योनींतून होत होत ती त्याच्या सध्याच्या स्थितीप्रत कशी होत गेली याचा एक पुरावा त्याच्या गर्भांतल्या हळू हळू होणाऱ्या गर्भाकृतींवरून मानण्यांत आला आहे.

सर्व सस्तन प्राण्यांच्या गर्भांची वाढ होत असतां त्या गर्भाचें जीवन त्यांच्या मातांच्या शरीरांवर सर्वस्वीं अवलंबून असतें. त्या गर्भाच्या आणि त्याच्या मातेच्या गर्भाशयाच्या दरम्यान एक कोथळी उत्पन्न व्हावयाला लागते. तिला इंग्रजी भाषेंत Placenta ( प्लसेन्टा ) व मराठींत वार म्हणतात. ही कोथळी

---

क्वचित् प्रसंगीं त्यापूर्वीं, पण त्यानंतर विरळा.

तेच्या गर्भाशयाच्या दिवाळीच्या कोणत्याही एका बाजूला लहान लहान रक्तवाहिन्यांनी चिकटलेली असते, आणि त्या कोथळींतून दोन नलिकायुक्त सुमारें हातभर लांबीची एक धमनी निघून ती त्या गर्भाच्या बेंबीद्वारा त्याच्या यकृतामार्फत त्याचें पोषण करून त्या गर्भाची वाढ तिच्यामुळें होत असते.

तें कसें काय होत असतें याचें सूक्ष्म निरीक्षण करण्याचें एक तर हें स्थल नव्हे; दुसरें सूज्ञ वाचकांस त्याविषयीं कंटाळा येईल असें वाटून, जास्त विवेचन न करितां, इतकेंच लिहावेंसें वाटतें कीं, गर्भाची वाढ ही एक अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट आहे; जिचा अभ्यास करतांना श्रीपरमेश्वराच्या या कृतीला पाहून मन दिङ्मूढ होतें.

असो. मूळ गोष्ट सांगावयाची ती अशी. मनुष्यप्राण्याच्या गर्भांत सुमारें तिसऱ्या महिन्यापासून एका मागून एक अशा अगदीं आश्चर्यकारक गोष्टी प्रमाणशीर व्हावयाला लागतात. हळूहळू पूर्वी जें एक मोठेंच मोटें डोयें दिसत होतें त्याला आतां विशेष आकार येऊन हातपायादि सर्व अवयव प्रमाणशीर दिसूं लागतात. त्या शरीरांत हाडें, मांस, रक्तवाहिन्या, डोक्यांत मेंदू, व त्यापासून निघणारें ज्ञान व चेतनातंतु, तसेंच नाक, कान, डोळे, शरीरावर त्वचा निर्माण होऊन, त्या शरीरांत फुप्फुसें, हृदय, आंतडीं व त्यांचे सूक्ष्म भाग निर्माण होऊं लागतात.

हे सर्व निर्माण होत असतांना त्याच्या शरीराची ही वाढ त्याच्या बेंबीच्याच मार्गानें होत असते. परंतु ही योजना त्याच्या पुढच्या स्वतंत्र जीवनास निरुपयोगी होणारी असल्या कारणानें त्याच्या पांचव्या महिन्यांत एक आश्चर्यकारक घटना घडते.

त्या लहानशा **शरीरांतलें हृदय आतां काम करूं लागतें.** मातेच्या शरीरांतून मिळालेलें रक्त त्याच्या बेंबीच्या मार्गानें त्याच्या यकृतद्वारा त्याच्या हृदयांत जाऊन, तेथून तें रक्त पंपाप्रमाणें त्याच्या शरीरांतल्या कोनाकोपऱ्यांत खेळवून, त्या शरीराला सर्व प्रकारें पूर्णावस्थेंत आणण्यास कारणीभूत होतें; जेणेंकरून मातेच्या शरीरांतून बाहेर पडल्यावर तिच्या शरीरांतर्गत

रक्ताचा उपयोग बंद झाल्यामुळें, त्याचें स्वतंत्र जीवन चालण्यास त्या गर्भाला पूर्ण योग्यता यावी. आणि तसेंच होतें ! !

आतां आपण मूळ मुद्यावर येऊं. सर्व प्राण्यांची गर्भस्थिति ही एक अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट आहे खरी ! त्यांतल्या त्यांत सर्व सस्तन प्राण्यांप्रमाणें त्या गर्भाच्या हृदयाला अमुक मुदतीनें चैतन्य उत्पन्न होऊन त्याच्या स्वतंत्र जीवनाचा ओनामा त्याच्या मातेच्या शरीरांत असतांनाच सुरू व्हावा ! ही चावी कोण व कशी फिरवितो ?

परमेश्वर वगैरे सर्व झूट आहे, परमेश्वराचें अस्तित्व मानणें हें एक शेंकडों वर्षांच्या मानसिक गुलामगिरीचें लक्षण आहे, असें मानणाऱ्या एका अत्यंत नास्तिक वृत्तीच्या डॉक्टराला लेखकानें ह्याच प्रश्न विचारला.

प्रश्न: —" मनुष्याच्या गर्भांत त्याच्या पांचव्या महिन्याच्या[1] सुमारास त्याचें हृदय चालूं लागतें तें कसें घडतें ?"

उत्तर:—" त्याच्या मातेच्या शरीरांतल्या रक्तांत त्या वेळीं शेंकडा सात टक्के मिठाची वृद्धी होते म्हणून. "

प्रश्न:—" क्षणभर कबूल ! परंतु त्या वेळीं ही त्याच्या मातेच्या शरीरांतल्या रक्तांत शेंकडा सात टक्क्यांनीं मिठाची वृद्धी कां होते ? व त्यामुळें त्या गर्भाचें तें हृदय चालू कसें होतें ?"

उत्तर:—"Oh ! It is a phenomnon. ( अहो ! ही एक चमत्कृतियुक्त गोष्ट आहे. ) "

प्रश्न:—What is a phenomenon ? (फेनॉमेना म्हणजे काय ?)

उत्तर:—" A phenomenon is a phenomenon. ( फेनॉमेना म्हणजे फेनॉमेना ! ! !")

प्रश्न:—" **ही** फेनॉमेना एक भाकडकथा तर नाहीं ना ? "

उत्तर:—"**नाहीं; ही एक चमत्कृतियुक्त खरी गोष्ट आहे; कशी आणि काय, सांगतां येत नाहीं ! !** "

१ मनुष्य प्राण्यांत सुमारें पांचव्या महिन्यांत.

वाचकवर्गापैकीं कोणीही स्वतः डॉक्टर असल्यास अथवा आपल्या ओळखीच्या प्रेमळ डॉक्टराकडून या वरील वर्णन केलेल्या Phenomenon बद्दल खुलासा करवून घेऊन तो लेखकाला कळविल्यास त्याच्यावर अत्यंत उपकार करण्याचें तो श्रेय घेईल.

लेखकाला स्वतःला तो, सन १८८१मध्यें Biology (प्राणीशास्त्राचें) अध्ययन करीत होता त्या वेळेपासून ही गोष्ट त्या परम कारुणिक सर्वशक्तिमान मागें वर्णन केलेल्या Cosmic Energy (कास्मिक एनर्जीरूपि) जगज्जननीचीच लीला याचा प्रत्यक्ष सप्रमाण दाखला आहे असें वाटत आलें आहे.

त्यामुळें श्रीसाईमाउलीनें या लेखाच्या सुरवातीला दर्शविलेली ही तिची एक कला नाहीं काय?

या सृष्टींत जे जे जगन्माउलीच्या लीलांचे आधुनिक पाश्चात्य संस्कृतीयुक्त विद्वान व विदुषींना Phenomenon (चमत्कृतियुक्त) दृष्टांत दिसून येतात त्यांपैकीं वर वर्णन केलेला हा दाखला रोजच्या अतिपरिचयाचा असल्यामुळें, त्याचा सामान्य जनता स्वाभाविक रीत्या खोल विचार करीत नाहीं. परंतु आपल्या ऋषिमुनींनीं **अंतर्ज्ञानानें त्याचें ईंगित जाणून आपल्या स्त्रियांचा जो अति उंच दर्जा ठरविला आहे तो यामुळेंच.**

**आपल्या संस्कृतीप्रमाणें कोणतेंही धार्मिक कृत्य अथवा विधि स्वधर्मिणी स्त्रीशिवाय यथासांग होऊं शकत नाहीं, आणि त्या विधीच्या पुण्यांशावर तिचा अर्धा हक्क ठेविलेलाच आहे. हा आमच्या स्त्रियांच्या हिंदुत्वाचा हक्क आजपर्यंत अबाधित आहे.**

पाश्चात्य हीन संस्कृतियुक्त समुदायांच्या संसर्गामुळें कीं, ज्या समाजांचे शिकवण कीं, स्त्री ही घरगुती सामानाप्रमाणें केवळ एक भोग्य वस्तु आहे, तिला आत्मा वगैरे कांहीं नाहीं; अशा अत्यंत रानवट विचारांच्या जनांच्या आघातामुळें आमच्यांत कांहीं अयोग्य चालीरीति घुसून त्यांमुळें आमच्या स्त्रीवर्गा

अगणित नुकसान झालें आहे. जें नुकसान आमचा स्त्रीवर्ग, आपलें अति उच्च नैसर्गिक ध्येय काय आहे याची जिज्ञासा स्वतःमध्यें उत्पन्न करवून, आपण इतर रानटी धर्मीयांच्या समजुतीप्रमाणें इकडून तिकडे घरगुती सामानांप्रमाणें पुरुषवर्गाच्या स्वेच्छेचे खेळ तर नाहीं, इतकेंच नव्हे, तर आपणामध्यें श्रीजगन्मातेचें रहस्य, तेज, व कृति, पूर्णपणें वसत आहे, ही जाणीव, स्वयंस्फूर्तिनें उत्पन्न करवून, आपलें हिंदुत्व काय आहे हें जाणून, जगाच्या इतिहासांत झळकून, आपलें दैवी सामर्थ्य व प्रभा पुन्हा दृष्टोत्पत्तीस आणून प्रत्येक स्त्री "मी महालक्ष्मी आहें" याची साक्षात् प्रचीति दाखवीलच दाखवील याचा लेखकाला पूर्ण भरंवसा आहे.

सर्व दीन दुबळेपणा नष्ट होऊन आमच्या स्त्रीवर्गाचा उत्कर्ष होऊन त्याप्रमाणें आमच्या जनतेनें आपला प्रभाव २०००।३००० वर्षांपूर्वी सर्व जगाला दाखविला त्याप्रमाणें यापुढें जगाच्या अंतापर्यंत ती दाखवीलच दाखवील. हीच तर आमच्या अंतर्गत असलेल्या हजारों वर्षांच्या जीवंत हिंदुत्वाची साक्ष आहे.

डोहाळेजेवण करणें, फुलें व ओटी भरणें, वगैरे वगैरे जे शुभेच्छायुक्त प्रकार आपल्या स्त्रीसमाजांत आज मितीस रूढ आहेत आणि ज्यांना आपले आधुनिक विद्वान् व विदुषी नाकें मुरडतात त्यांच्या मुळाशीं हेंच रहस्य आहे कीं, गर्भिणी स्त्रीची वृत्ति सदा आनंदमयी राहावी; त्यांत जर मागें वर्णन केलेली autosuggestion म्हणजे स्फूर्ति उत्पन्न होईल कीं, "माझें बाळ एक अद्वितीय रत्न निर्माण होऊन सर्व जग हालवून सोडील." तर त्या स्फूर्तीच्या विचारांचा तसा परिणाम घडून त्याची पुढील कृति तशी झालीच पाहिजे.

आपल्या जनतेवर जेव्हां जेव्हां पूर्वी भयंकर आघात झाले व त्यानंतर होत आले आहेत व पुढें होतीलही, त्यांपासून आपण निरुत्साही न होतां

१ श्री साई माउलीचे शब्द "मी महालक्ष्मी आहें. मी खोटें बोलत नसतों," या शब्दांचा प्रत्येक भाविकानें "सोहं" प्रमाणेच स्वोन्नतिसाठीं मंत्रोच्चार करावयाचा आहे.

—संपादक.

रोच आघात आपल्याला परिणामीं सर्व बाजूंनीं कल्याणकारक असेच प्रत्यो-त्पत्तीस आले आहेत व येतील हा अनुभवसिद्धांत आहे.

आपणांतलें हिंदुत्व अमर कां आहे तर त्याला अध्यात्माचा पूर्ण पाठिंबा आहे म्हणून. रानटी संस्कृतीच्या जनांच्या संसर्गामुळें आमच्यांत खोटे आचार-विचार घुसून आम्हीं आमच्या शीलापासून जेव्हां जेव्हां च्युत होतों, तेव्हां तेव्हां आमच्या अध्यात्मविचारद्वारें आमच्या साधुसंतांनीं आम्हाला वाचविलें आहे. श्रीभगवंतांनीं यासाठींच श्रीगीता गायिली. "क्लैब्यं मास्म ( दुबळा बनूं नकोस. )

"मी तुझ्याबरोबर शेंकडों जन्म आहें."

"जेव्हां जेव्हां धर्माची घडी विघडून अधर्माचा प्रादुर्भाव होतो तेव्हां तेव्हां मला तुझ्यासाठीं जन्म घ्यावा लागतो," अशीं काय एक कीं दोन छातीठोक वचनें सांगितलीं ? जो दीनदयाळ, दीनवत्सल प्रभु इतर धर्मीयांना अगम्य, तो आमच्यासाठीं आमच्याचप्रमाणें स्वतः अथवा संतांकरवीं देह धारण करून आमचें कोट कल्याण सतत करीत आला आहे.

श्रीगीता आमच्या अंतर्गत हिंदुत्वाचा पूर्ण आधार आहे. तिचें अध्य-यन आधुनिक विद्वान् व विदुषींनीं आस्थापूर्वक करून अनुभव घ्यावयाचा आहे.

कोणी मानो अथवा न मानो जितके बाह्य आघात घडतील तितकें आपलें हिंदुत्व उसळून आपणाला विशेष सामर्थ्यवान बनवील.

श्री. जिजादेवी गरोदर असतां, शत्रूंनीं पाठलाग केला तरी हताश होऊन ती गलितगर्भ झाली नाहीं, परंतु अशा दिव्य गर्भाला जन्म दिला कीं, ज्यामुळें आमचें नष्ट होणारें हिंदुत्व ऐन वेळेवर वचून कायम राहिलें आहे, आणि तें जगाच्या अंतापर्यंत राहाणार, आणि हें तर एका स्त्रीमुळें झालें !!

श्री. जिजादेवीनें याप्रमाणें एका सर्वांगसुंदरपूर्ण अशा बाळाला जन्म दिल्यामुळें मुख्यत्वेंकरून महाराष्ट्रीय स्त्रियांत त्याच श्रीहिंदुदेविरूपि भवानी-मातेनें जसा काय संचार केल्याप्रमाणें एकाहून एक अशीं थोर थोर रत्नें

अगदीं स्वल्प काळांत निर्माण झाली कीं, दोन पिढ्यांच्या आंत त्या रत्नांनीं अटकेपासून तों कन्याकुमारीपर्यंत दिग्विजय गाजवून, आमच्या हिंदुत्त्वाचें सर्व बाजूंनीं संरक्षण केलें.

थोड्या अपवादांखेरीज या सर्व रत्नांच्या दिव्य मातांचीं नांवें जगाला ठाऊक नाहींत; तरी पण त्यांतल्या प्रत्येकीच्या ध्यानींमनीं त्यांच्या गरोदरपणांत अहोरात्र Autosuggestion म्हणजे स्वयंस्फूर्तियुक्त हाच विचार जागृत असलाच पाहिजे कीं, " माझ्या पोटीं दिव्य बालक निर्माण होऊन दिग्विजय करील ! " या सर्व स्त्रिया थोर ऋषिमुनींच्या कुळांतील कन्यका असल्यामुळें तसा परिणाम झाला नाहीं काय ? आणि त्याच कारणामुळें यापुढेंही तीच भावना जागृत राहिल्यास तोच इष्ट परिणाम होणार इतकेंच नव्हे तर **झालाच पाहिजे.**

यासाठीं सामान्य जगाच्या मातानें घरची स्थिति कितीही निकृष्ट असो, सध्याच्या व यापुढें होणाऱ्या सर्व गर्भवती स्त्रियांनीं आपण B.A. अथवा M.A. आहोंत अथवा होऊं या शुष्क गोष्टींकडेच आपल्या आयुष्याचें अंतिम ध्येय न ठेवतां पाश्चात्य विद्या शिकतांनाही आपण थोर ऋषिमुनींच्या कन्यका आहोंत, जगांतल्या इतर सर्व स्त्रियांपेक्षां आमचा दर्जा अति उंच आहे, याचा पूर्ण अभिमान बाळगून, आमच्या ऋषिमुनींनीं अध्यात्मशास्त्रद्वारें काय अपूर्व शोध लावले आहेत, आमच्या साधुसंतांचीं वचनें किती अमोलिक व स्फूर्तियुक्त आहेत, पाश्चात्यांनीं आम्हाला आमची दिशाभूल करण्याची जी खटपट आज हजारों वर्षांपासून चालविली आहे तिच्यामुळें हताश न होतां आपली संस्कृति आपल्याला कोणत्या अवर्णनीय स्थितिप्रत नेऊं शकते, हें ध्येय आपल्या मनःचक्षूंपुढें सतत ठेवणें हेंच आमचें आद्य कर्तव्य आहे. ही वृत्ति निरंतर कायम ठेवल्यास व पाश्चात्यांपासून या वृत्तीला पोषक असेच विचार गृहण करून आमच्या पोटीं अलौकिक रत्नें निर्माण होऊन सर्व जगाला आदर्शवत् होऊन आमचें धार्मिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक व सामुदायिक कोटकल्याण होईल यांत मुळींच संदेह नाहीं.

कारण इतिहासांत वर्णन केलेले रोमन, ग्रीक, खाल्डियन, मिश्र वगै सर्व जनसमुदाय त्यांच्या सर्व संस्कृतींसह नष्ट होऊन, आपलें हिंदुत्व अ असल्यामुळें आपण जगाच्या इतिहासांत आमच्या परमपूज्य मातांच्या अ निर्दिष्ट केलेल्या दिव्य ध्येयांमुळें पुन्हा आदर्शवत् होऊं.

शेवटीं ज्या परमपूज्य व पवित्र श्रीसाईमाउलीनें वर वर्णन केलेली आपली एक कला सुमारें पन्नास वर्षांमागें अभ्यासक्रम चालवीत असतां, चर करून वरील विचारांना चालना दिली, त्या श्रीसाईमाउलीच्या चरणी हा लेख अत्यंत विनम्र भावानें अर्पण करून, वेडेवांकडे शब्द लिहि बद्दल सूज्ञ वाचकांची क्षमा मागणारा

"म्हातारा."

---

# श्री कायम–फंड खातें

| | | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|---|
| | | | शके १८५३ च्या आश्विन महिन्यांत प्रसिद्ध झालेले | १६३–३–६ |
| १९३१ | | | | |
| सप्टेंबर | १९ | श्री. | बाळकृष्ण राघव सावंत | १–५–३ |
| ,, | २३ | ,, | जे. ए. खेर, गार्ड, दौंड | ५–०–० |
| ,, | २४ | डॉ. | हिरालाल आर. क्लार्क, खंभात | २५–०–० |
| अक्टोबर | ३ | रा. | नारसिंह फडणीस, जळगांव | ३–०–० |
| ,, | ५ | ,, | आर. व्ही. पाटणकर, नाशीक | २–८–० |
| ,, | ,, | ,, | जयराम पांडुरंग वाघकर c/o गिल आणि कं. मोदोटा बिल्डिंग, कराची | ५–०–० |
| ,, | ,, | कॅप्टन | भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०–०–० |
| ,, | ७ | रा. | आ. ला. आरोळकर, गुंताकल | [illegible] |
| ,, | ८ | ,, | गोविंद नामाजी पाटील, आढांची पो. वाग्री [illegible], | १५–८–० |
| ,, | १० | ,, | दत्तात्रय मोरेश्वर सबनीस, दीक्षीत वाडा, पार्ले | ५–०–० |
| ,, | ११ | ,, | यशवंत जनार्दन गाळवणकर, सप्टेंबर | ५–०–० |
| ,, | ,, | ,, | दाजी विठ्ठल सांबारे, जुलै–सप्टेंबर | ६–०–० |
| ,, | १४ | डॉ. | एम. रत्नपारखी, बेमेतारा C. P. | ५–०–० |
| ,, | ,, | रा. | बाळकृष्ण रा. सावंत, अक्टोबर | १–५–३ |
| ,, | ,, | ,, | विठ्ठल रघुवीर पुरंदरे | ०–६–० |
| ,, | ,, | ,, | आ. प. ढोळस कांदिवली आ. न. हि. | १–८–० |
| ,, | १६ | ,, | हरी गोपाळ सकपाल, जु. आ. स. | ३–०–० |
| ,, | ,, | डॉ. | छोटालाल भुलाभाई भट, मुरबाड, ठाणें | १–१०–० |
| ,, | १७ | रा. | प्रभाकर नारायण पाटणकर, वांद्रें | ६–४–० |
| ,, | १९ | ,, | रामचंद्र व्यंकप्पा सुगंधी, विजापूर | ३–०–० |
| ,, | २१ | ,, | गजानन शिवराम पाटणकर, पारनेर | ७–१–० |
| ,, | २३ | ,, | नागेश आत्माराम सावंत, परळ | ६०–०–० |
| ,, | ,, | सौ. | श्रीमतीबाई बाळकृष्ण राऊत, खो. नं. २६ कृष्णा बिल्डिंग नं. ३, परळ मुंबई १२ | ५–०–० |
| ,, | २६ | गं.भा. | आनंदीबाई वामन वर्वे, तारापूर, ठाणें | ५–०–० |
| ,, | २७ | रा. | विनायक आप्पाजी वैद्य, अंधेरी | १–१–० |
| ,, | २९ | रा. | विनायक लिंबाजी कोंडाळ, कामाठीपुरा | ६–०–० |

| | | | | रु. आ. |
|---|---|---|---|---|
| १९३१ | | | | |
| अक्टोबर | ,, | ,, | शामराव आर. जयकर, पार्ले | ५-०- |
| ,, | ,, | ,, | आनंदराव बी. व्यवहारकर, मुंबई | २-०- |
| ,, | ,, | मे | आरदेशर ना. इराणी, ,, | ५-०- |
| ,, | ,, | रा. | केशव गणेश आजरेकर, बेळगांव | ६-०- |
| ,, | ,, | ,, | कृष्णाजी नारायण पेंडुरकर, मेघा बिल्डिंग, दादर | ५-०- |
| नवेंबर | ३ | ,, | गणेश विठ्ठल करंदीकर, माहीम | ५-०- |
| ,, | ,, | ,, | आर. व्ही. पाटणकर, नाशीक | २-८- |
| ,, | ५ | ,, | ना. न. फडणीस. जळगांव | ३-०- |
| ,, | ,, | मे. | पिरोजशाह चिनाय, वांद्रे | २-४- |
| ,, | ६ | श्री. | वहिनीबाई शामराव प्रभाकर, मुंबई | ०-८- |
| ,, | ७ | रा. | बाळकृष्ण राघव सावंत, वांद्रे, नवेंबर | १-५- |
| ,, | ,, | आ. | भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०-० |
| ,, | ९ | रा. | रा. आ. तर्खड, दिवाळीचे, वांद्रे | ५-० |
| ,, | १० | ,, | ,, ,, ,, बलिप्रतिपदेचे ,, | १-४ |
| ,, | ,, | ,, | नारायण रामनाथ सातघरे, | २५-० |
| ,, | ,, | ,, | दामोदर सदाशिव श्रोत्री, ,, | १-६ |
| ,, | ११ | ,, | रा. आ. तर्खड, चंद्रदर्शन ,, | १-० |
| ,, | १३ | ,, | य. ज. गाळवणकर, अक्टोबर ,, | ५-० |
| ,, | ,, | ,, | विष्णु गोविंद देव | ५-० |
| ,, | ,, | सौ. | उमाबाई देव श्रीलक्ष्मी विलास, शिरा, आ. न. | १०-० |
| ,, | ,, | ,, | ,, ,, पेटी से. आ. | ४-० |
| ,, | १४ | रा. | गजानन कृष्णराव प्रभाकर | ०-८ |
| डिसेंबर | ७ | कॅप्टन | भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०-० |
| ,, | ,, | रा. | शांताराम बळवंत नाचणे, वांद्रे | २-० |
| ,, | ११ | ,, | बाळकृष्ण रा. सावंत, डिसेंबर | १-५ |
| ,, | १४ | सौ. | कमळाबाई देव, शिरा, डिसेंबर | ५- |
| ,, | ,, | ,, | ,, ,, पेटी, नोव्हेंबर | २- |
| ,, | ,, | रा. | रेवण सिद्प्पा चेन बसप्पा, हुंडिकेरी, सोलापूर | ११- |
| ,, | १६ | ,, | आर. व्ही. सुगंधी अँन्ड सन्स, विजापूर | ७- |
| ,, | १ | ,, | व्ही. आर. संत, वकील जिरापूर, होळकर | २- |
| ,, | ३ | ,, | एम. डी. तारापूरवाला, रायचूर | २- |
| ,, | ,, | ,, | आर. व्ही. पाटणकर, नाशीक | २- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९३१ | | | | रु. आ. पै. |
| डिसेंबर | ४ | ,, | ना. न. फडणीस, जळगांव | ३-०-० |
| ,, | ६ | ,, | य. जं. मालवणकर, वांद्रे, नोव्हेंबर | ५-०-० |
| ,, | ,, | सौ. | सीताबाई राजाराम वालावलकर | १-०-० |
| ,, | १८ | कु. | विमल देवी देसाई, बडोदें | ५-०-० |
| ,, | २१ | रा. | जे. ए. खेर, मुन्नेवाडा, नवी पेठ, सोलापूर | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | के. वाय. प्रधान, जळगांव | २-४-० |
| ,, | ,, | ,, | दत्ताराम आनंदराव पितळे, मुंबई | १-४-० |
| ,, | ,, | ,, | वासुदेव महादेव कोलंगडे, भुसावळ | ५-०-० |
| ,, | ,, | सौ. | यशोदाबाई नारायण नाईक, सफाला | १-२-० |
| ,, | ,, | रा. | मणिलाल उत्तमचंद, P. W. टाईम कीपर, भुसावळ | ५-०-० |
| १९३२ | | | | |
| जानेवारी | १ | ,, | दाजी विठ्ठल सांबारे, पार्ले, आ. न. डि. | ६-०-० |
| ,, | ,, | ,, | नारायण नरसिंह फडणीस, जळगांव | ३-०-० |
| ,, | ५ | मे. | ए. डी. तारापोरवाला रायचूर | २-०-० |
| ,, | ७ | रा. | आत्माराम ला. आरोळकर, गुंताकल, जा. फे. मा. | १०-०-० |
| ,, | ,, | ,, | आर, व्ही. पाटणकर नाशीक | २-८-० |
| ,, | ८ | कॅप्टन | भा. रा. चांदोरकर, भंडारा | ०-०-० |
| ,, | ,, | रा. | गंगाराम भिकाजी पांगारकर, परळ, तंबाखूचे दुकान जगू सेठची चाळ, करीरोड | ६-०-० |
| ,, | १६ | ,, | आर. व्ही. सुगंधी, विजापूर | १०-०-० |
| ,, | ,, | ,, | बाळकृष्ण रा. सावंत वांद्रे, जानेवारी | १-५-३ |
| ,, | १७ | ,, | यशवंत ज. गाळवणकर, डिसेंबर | ५-०-० |
| ,, | १८ | सौ. | उमाबाई देव श्रीविलास शिरा, जानेवारी | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | पैटी, डिसेंबर | २-०-० |
| ,, | २२ | डॉ. | वि. गो. हाटे, भवानगड | ५-०-० |
| ,, | २३ | रा. | जयराम पां. वाकर, गिल कं., कराची | १०-०-० |
| ,, | २५ | ,, | दुल्लाजी के. टेमकर | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | नरहर दिनकर फाटक, डोंगरे बाग, दादर | ५०-०-० |
| ,, | ,, | ,, | पांडुरंग व्यंकटेश ताम्हणकर, चिचबंदर, मुंबई | ५-०-० |
| फेब्रुवारी | २ | डॉ. | वि. गो. हाटे, नवलगड | ५-०-० |
| ,, | ,, | रा. | आर. व्ही. पाटणकर, नाशीक | १-४-० |
| ,, | ४ | ,, | नारायण नरसिंह फडणीस, जळगांव | ३-०-० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९३२ | | | | रु. आ. पै. |
| फेब्रुवारी | ५ | डॉ. | छोटालाल भुलाभाई भट, मुरबाड, ठाणें | ५-०-० |
| ,, | ,, | रा. | गणेश महादेव कुळकर्णी, कानवई, नाशीक | १-४-० |
| ,, | ७ | ,, | यशवंत ज. गाळवणकर, वांद्रें, जानेवारी, | ५-०-० |
| ,, | ,, | सौ. | कमळाबाई देव, शिरा, ठाणें, फेब्रुवारी, | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | ,, ,, पेटी, जानेवारी | २-०-० |
| ,, | ,, | ,, | ,, ,, परीक्षा | ५-०-० |
| ,, | ,, | रा. | पी. सी डोरवणकर | ३-२-० |
| ,, | ८ | कॅप्टन | भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०-०-० |
| ,, | ९ | रा. | सुं. दि. नवलकर, मुंबई | २-९-० |
| ,, | ११ | ,, | गंगाराम भिकाजी पांगारकर, करीरोड, मुंबई | १-४-० |
| ,, | ,, | ,, | गोपाळ प्रह्लाद आंभळे, सातारा | १-०-० |
| ,, | ,, | श्री | पुण्यतिथी हिशेबाची शिल्लक | २०५-१-६ |
| ,, | १२ | रा. | सुं. दि. नवलकर, मुलाची मुंज, मुंबई | १-४-० |
| ,, | १८ | ,, | बाळकृष्ण रा. सावंत, वांद्रें, फेब्रुवारी, | ५-५-३ |
| ,, | २४ | कॅप्टन | वि. गो. हाटे, भवानगड | ७-०-० |
| ,, | २५ | मे. | इंडो जर्मन लाइटिंग कं., मुंबई | १-४-० |
| ,, | २८ | रा. | नरहर दिनकर फाटक, दादर | २-४-० |
| मार्च | ४ | ,, | ना. नसिंह फडणीस, जळगांव | ३-०-० |
| ,, | ,, | ,, | वामन गोपाळ हेजीब श्री. जयराम पां. वाक्कर मार्फत, कराची | ५-०-० |
| ,, | ,, | डॉ. | छोटालाल भुलाभाई भट, मुरबाड, ठाणें | ५-०-० |
| ,, | ,, | रा. | आर. व्ही. पात्रणकर, नाशीक | १-४-० |
| ,, | ,, | ,, | य. ज. गाळवणकर, फेब्रुवारी | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | वळवंत हरी कर्णिक, स्वतः व ती | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | ,, ,, ,, मुलाच्या व ती | २-०-० |
| ,, | ६ | रा. | विनायक आप्पाजी वैद्य, अंधेरी | १-१५- |
| ,, | ७ | ,, | सावळाराम आत्माराम शिरोडकर, कुर्ले | १०-४- |
| ,, | ,, | ,, | रा. आ. तखंड, वांद्रें | १-४- |
| ,, | ,, | ,, | व्ही. जी. कानिटकर, सातभाई गल्ली, नगर | ३-०- |
| ,, | ,, | मे. | अबदुल हक्क, श्री. आ. ला. आरोळकर मार्फत | १०-०- |
| ,, | १४ | कॅप्टन | भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०-०- |
| ,, | १५ | रा. | दामोदर विनायक गिरधर, अंधेरी | २-८- |

| १९३२ | | | | रु. आ. पै |
|---|---|---|---|---|
| मार्च | ,, | ,, | रामभाऊ पाटकर, अंधेरी | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | केशव नथोबा जोशी, ,, | ०-९-० |
| ,, | १६ | ,, | बाळकृष्ण रा. सावंत, बांद्रे, मार्च | १-५-३ |
| ,, | १७ | सौ. | शांताबाई सुंदरराव नवलकर, | १३-१४-६ |
| ,, | १९ | रा. | रा. आ. तर्खड, बांद्रे | १-४-० |
| ,, | २२ | सौ. | उमाबाई देव, शिरा मार्च | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | ,, ,, पेटी फेब्रुवारी | २-०-० |
| ,, | ,, | रा. | गंगाराम भिकाजी पांगारकर, करीरोड, परळ | १-४-० |
| एप्रिल | १ | ,, | मोरेश्वर नारायण सावे, गांवदेवी, मुंबई | १-२-० |
| ,, | ,, | ,, | केशव गणेश आजरेकर, बेळगांव | १-६-० |
| ,, | ,, | ,, | घनश्याम शिवराम कांबळी, मुंबई | १-४-० |
| ,, | २ | ,, | आ. प. डोळस, कांदिवली, ३ महिन्यांचे | १-८-० |
| ,, | ३ | ,, | यशवंत ज. गाळवणकर, मार्च | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | दाजी विठ्ठल सांवरे, जा फे. मार्च | ६-०-० |
| ,, | ,, | ,, | भास्कर बाबाजी मायदेव, मांडवसार, पो. नारिंगी ,कुलाबा | २-०-० |
| ,, | ,, | सौ. | छोटुबाई मोरेश्वर प्रधान, सान्ताक्रूझ | ४-०-० |
| ,, | ,, | ,, | कॅप्टन वि. गो. हाटे, भवानगड | ५-०-० |
| ,, | ,, | रा. | गणेश महादेव कुळकर्णी, कानवई, नाशीक | १-४-० |
| ,, | ,, | ,, | नारायण नृसिंह फडणीस जळगांव | ३-०-० |
| ,, | ५ | ,, | कॅप्टन भा. रा. चांदोरकर, भंडारा | १०-०-० |

एकंदर रुपये १९००-३-६

# भक्तमंडळखातें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९३१ | | श्री | अश्विन शके १८५३ च्या अंकांत प्रसिद्ध झालेली | २६१ |
| सप्टेंबर | ७ | ,, | चिंतामण परशराम भिडे, वाई १८५३ | ५-०-० |
| अक्टो. | १४ | ,, | धोंडू मनोहर रत्नापारखी, १८५३ | ५-०-० |
| ,, | २३ | ,, | गो. का. गाडगीळ, पुणें | ५-०-० |
| ,, | ,, | सौ. | लक्ष्मीबाई गो. गाडगीळ | ५-०-० |
| नवेंबर | १२ | रा. | त्र्यंबक बळवंत चित्रे १८५३ | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | हरिश्चंद्र रा. मिस्त्री, अंधेरी | १०-०-० |
| डिसेंबर | ६ | ,, | दत्तात्रय नारायण पाटणकर, १८५३ | ५-०-० |
| ,, | ११ | ,, | विठ्ठल लक्ष्मण सुगंध, १८५३ | ५-०-० |
| १९३२ | | | | |
| जानेवारी | १ | ,, | विठ्ठल केशव देसाई, पार्ले १८५३ | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | यशवंत बाळकृष्ण वांवर्डेकर, १८५३ | ५-०-० |
| ,, | २५ | ,, | विनायक शंकर गिरधर, अंधेरी | ५-०-० |
| मार्च | ३१ | ,, | शामराव भास्कर कंटक, मुंबई, १८५४ | ५-०-० |
| एप्रिल | १ | ,, | मोरेश्वर नारायण खात्रे, १८५४ | ५-०-० |
| ,, | ,, | ,, | केशव गणेश आजरेकर, बेळगांव | ५-०-० |
| ,, | ८ | ,, | रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर, मुंबई १८५३ | ५-०-० |
| | | | | ३४१-०-० |

# श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

## श्रीशिरडी ( शैलधी ) संस्थानचा १९ वा म्हणजे शके १८५३ चा अहवाल.

या अहवालाच्या मुदतींत संस्थान कमिटीच्या एकंदर ४ सभा श्रीशैलध व सांताक्रूझ या दोन ठिकाणीं मिळून झाल्या.

२. लेंडी बागेंत लावलेल्या फुलझाडांस व फळझाडांस पाणी देण्याकरित लोकलबोर्डाकडून नजीकच असलेल्या बोर्डाच्या विहिरीचें पाणी घेण्यार बोर्डाकडे परवानगी मागण्याचा अर्ज केल्याप्रमाणें परवानगी मिळाली, व त्य विहिरीवर अर्धा लांकडी व अर्धा लोखंडी रहाटही बसविला होता; परंतु गांवां तील कांहीं आडदांड व अज्ञान मुलें रहाटावर चढून त्यावर बसूं लागलीं. ही गोष्ट अत्यंत धोक्याची आहे असें नजरेस येतांच त्या विहिरी[illegible] रहाट तावडतोब काढून तो श्रीसाईबाबांच्या लेंडीबागेंतील [illegible] बाबांनीं भक्तमंडळीच्या मदतीनें निर्मित केलेल्या विहिरीवर बसविला. या विहिरीस पाणी विपुल असल्यामुळें व विहीर बागेच्या तारेच्या कुंपणाच्या आंत असल्यामुळें तेथें मुलांचा त्रास न होतां बागेंतील झाडांस पाणी भरपूर मिळतें. या विहिरीवर धुण्याची सोय तात्पुरती केली आहे; परंतु उत्सवांत भक्तवृंद मोठा जमतो. त्यांच्या सोईकरितां स्नानाची व धुण्याची जास्त विस्तृत सोय करण्याची तजवीज चालू आहे.

३. सदर लेंडी बागेस व लोकलबोर्ड विहिरीस लागून सरकारी मोफत नंबरची जागा आहे. त्यांपैकीं सुमारें १०–११ गुंठे जागा, जास्त फुल व फळझाडें लावण्याकरितां अर्ज करून पूर्वींच मागितली आहे. चौकशी होऊन काम जिल्हे हुजूर गेलें आहे. आद्याप निकाल हुकुम आला नाहीं. तगादा सुरू आहे.

४. या फुलबागेनजीक उत्सवांत येणाऱ्या बायकामाणसांकरितां पूर्वींचे मोडलेले दोन पायखानें सालमजकुरीं नवीन बांधले आहेत. त्यामुळें मध्यंतरीं भासत असलेली ही गैरसोय बव्हंशीं दूर झालेली आहे. आणखी दोन नवीन पायखानें पूर्वींच्या पायखान्याजवळ बांधावयाचे आहेत. त्यामुळें पुढें येणाऱ्या सालोसालच्या उत्सवांत गैरसोय भासणार नाहीं असें वाटतें.

५. या अहवालाचा वर्षीं श्रीयुत माळीबुवांचे मरणानें संस्थानावर लहानशी आपत्ती आली. माळीबुवा हे लिंगायत क्षत्रिय जातीचे असून तरुण होते. हे घरचे संपन्न असून संसारी होते. परंतु त्यांस एकाएकी उपरती होऊन त्यांनीं संसारसुखावर लाथ मारली, व शिरडीस श्रीसाईनाथांच्या द्वारकामाईची व समाधीची सेवा करण्याकरतां येऊन राहिले. त्यांचा दर-रोजचा काल अति पवित्र कृत्यांत जात असे. ते नित्य पहाटे दोन [illegible] उठून थंडोदकानें स्नान करीत, व श्री द्वारकामाईंत बाबांच्या तसबिरीपुढें व धुनीमाईशेजारीं १८ अध्याय गीता वाचीत. तिसऱ्या प्रहरीं समाधीपुढें श्रीसाईसच्चरित, दासबोध, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व रामायण या महत् श्रेष्ठ व विश्ववंद्य ग्रंथांचें पुराण वाचीत. श्रीयुत नाना पुजारी हे यांना नित्य पहांटेच्या काकडआरतीपासून रात्रीच्या शेजारतीपर्यंत चारी आरत्यांच्या वेळीं, समाधी स्नानाच्या वेळीं व इतर हरएक कामीं अंतःकरणपूर्वक मदत करीत.

तसेंच शिरडीस येणाऱ्या सर्व परिचित व अपरिचित भक्तांस योग्य ती मदत देत व त्यांची संस्थानाकडून त्यांच्याजवळ दिलेल्या टिपणपुस्तकांत सांगितल्याप्रमाणें नोंद करून ठेवीत. हे आल्यागेल्यास उत्तम प्रकारें मदत करीत असत. शिरडींतील सर्व प्रेक्षणीय स्थलांची व वस्तूंची माहिती देऊन तीं स्थळें व त्या वस्तु स्त्रीपुरुष-भक्तांस परमादरानें व प्रेमानें दाखवीत असत. अशा प्रकारचे शेरे यांनीं भक्तसमुदायाकडून या टिपणपुस्तकांत मिळविलेले आहेत. हे पूर्ण निरपेक्ष, निरिच्छ व विरक्त होते. येवढ्या, बाबांच्या व भक्तांच्या सेवेकरितां संस्थानाकडून ते अत्यल्प वेतन घेत असत. ते प्रत्यहीं

१८-२० तास वर लिहिल्याप्रमाणें सेवेंत तत्पर असत. त्यांनीं याप्रमाणें सुमारें २-२॥ वर्षें निष्काम सेवा केली. त्यांना सन्निपात होऊन ते एकाएकीं दिवंगत झाले. त्यामुळें संस्थानचें बरेंच नुकसान झालें. हल्लीं त्यांच्या जागेवर श्री. बाळा चोपदार शिंपी हे काम करीत असतात. त्या जागीं अद्याप कायमची नेमणूक कोणाची झाली नाहीं. श्रीबाबा माळीबोवाचे आत्म्यास सुगति देवोत.

६. या अहवालाचे वर्षीं संस्थानावर तीन चार वर्षांपासून चालत आलेली आपत्ति म्हणजे "श्रीसाईलीला" मासिक मध्यंतरीं एक वेळ कांहीं अपरिहार्य अडचणींमुळें सुमारें एक वर्ष बंद पडून नंतर जरी दुप्पट जोमानें सुरू झालें, तरी त्यामुळें त्याचे जे वर्गणीदार एकदम हजाराचे तीनचारशेंवर आले ते यांही अहवालाचे वर्षांत विशेष जास्त वाढले नाहींत ही होय. तरी एक वेळ संतुष्ट असून मध्यंतरीं मासिक बंद पडल्यामुळें रुष्ट झालेला श्रीसाई-लीलेच्या आश्रयदात्यांचा वर्ग पुनरपि तिजवर प्रेम ठेवून तिला अंतःकरणपूर्वक उदार आश्रय देऊन तिच्या सर्वसामान्य दोषांकडे लक्ष न देतां गुणैक दृष्टीनें निरखून पूर्वीप्रमाणें सेवा घेत जाईल व त्यायोगें श्रीबाबांची सेवा करीत राहील व संस्थाननिर्वाहास थोडाफार हातभार लावील अशी संस्थान कमिटीची सर्व भक्त व वाचकवृंदास सविनय प्रार्थना आहे.

हल्लीं ही लीलामाई आपल्या पदवीधर व पूर्णानुभवी "म्हाताऱ्या" आजोबांच्या तालमींत वाढते आहे. तिला स्वतःला स्वतःच्याच लीलेच्या अनुभवसिद्ध गोष्टी ऐकण्याचा फार नाद. तिला कोणी उपनिषदांतल्या, पुराणांतल्या, वेदांतांतल्या, ज्ञानेश्वरींतल्या, स्वप्नाच्या, भुतांखेतांच्या, रोगराईच्या गोष्टी सांगतात. व तिचे "म्हातारे" आजोबा तिला त्यांतील सत्यावरोबर शास्त्रीय पद्धतीनें पटवून देतात. श्रीसाईभक्तांनीं व लीलावाचकवृंदांनीं या ज्ञानाचा अवश्य अनुभव घ्यावा अशी त्यांना कळकळीची प्रार्थना आहे.

७. गेल्या सालच्या उत्पन्नांत व चालू सालच्या उत्पन्नांत पुष्कळ तफावत आहे. शके १८५३ सालच्या प्रारंभींची शिल्लक रु. ३१६६६–१५–५ असून

सालअखेरची शिल्लक रु. ३९६६५–१०–८ आहे. म्हणजे ह्या वर्षांत गेल्या सालपेक्षां अजमासें रु. ७००० जास्त मिळाले, असें दिसतें. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. याचीं कारणें खालीं दिलीं आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) या सालीं व्याजाची रकम आली ती | रु. | १७७०–१४–८ |
| (२) इन्कमटॅक्सचे रिफंडची रकम | रु. | १६३–८–० |
| (३) कायम फंडाकडे आलेली रकम | रु. | १९००–३–३ |
| (४) भक्तमंडळनिधीची आलेली रकम | रु. | ३४१–०–० |
| (५) मुंबईहून मिळालेली रकम | रु. | १५५५–०–० |
| (६) श्रीशिरडी संस्थानास निरनिराळ्या स्वरूपांत दिलेल्या देणग्यांच्या रकमा | रु. | ९४३–२–० |
| (७) किरकोळ रकमा | रु. | ५४१–२–० |
| | | ७११४–१४–११ |
| (८) वर्षारंभीं हातीं असलेली शिल्लक | | ८८३–१२–४ |
| | | ७९९८–११–३ |

यापैकीं संस्थानास मिळालेल्या देणग्यांची रकम दरसालइतकीच आहे. हातीं असलेली शिल्लक दरसालपेक्षां कमीच आहे. दरसालचा खर्च अजमासें २५०० पासून ३००० पर्यंत असतो, व जमाही अजमासें तितकाच असते. परंतु या वर्षीं, व्याज, रिफंड, कायमफंड, भक्तमंडळ वर्गणी, व किरकोळ रकमा दरसालपेक्षां बऱ्याच जास्त आहेत. खर्चही या वर्षीं ३००० रुपयांवर गेला आहे. परंतु तो योग्य व अवश्य अशाच कारणांकडे झाला आहे. मुंबईची रकम दुतेरजी आहे. म्हणजे या वर्षीं गेल्या वर्षापेक्षा अजमासें १०००–१५०० रुपयेच जास्तच आले आहेत.

७ अ. सालमजकुरीं ललितकलादर्श नाटक मंडळीचे उदार, उत्साही व सत्वशील मालक श्री. व्यंकटराव पेंढारकर यांच्या मातुःश्री श्रीमती राधाबाईंनीं श्रीबाबांच्या पुण्यतिथीपासून बाबांच्या रोजच्या नैवेद्यावर एक बेसनाचा लाडू

घालण्याकरतां दरमहा दोन रुपये देण्याचें बाबांच्या पुण्यसमाधीजवळ स्वयं-स्फूर्तीनें कबूल करून त्याप्रमाणें कांहीं रकम संस्थान खजिनदार यांजकडे श्रीयुत देव यांचेमार्फत देऊन ठेविली आहे, व त्याप्रमाणें श्री. नानू पूजारी हे श्रींच्या नित्याच्या दोन प्रहरच्या नैवेद्यावर नेहमीप्रमाणें खीर, शिरा हीं दोन पक्वान्नें वाढून शिवाय गेल्या पुण्यतिथीपासून एक वेसनाचा लाडू घालतात. श्रीमती राधाबाईंचें व त्यांच्या चिरंजीवांचें, या स्तुत्य कृत्याबद्दल श्रीबाबा कल्याण करोत.

८. कै. श्रीयुत दामोदर घनःश्याम उर्फ आण्णा बाबरे चिंचणकर यांनीं केलेल्या मृत्युपत्रांतील अटीसंबधानें ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टांत ता.५-११-२९रोजीं केलेल्या अर्जाचा निकाल ता.२६-४-३० रोजीं मिळाला. परंतु त्यांत पुन्हा दुरुस्त्या होऊन अखेर निकाल त्या कोर्टाकडून ता.२६-६-३० रोजीं मिळाला. तो निकाल आण्णाचे विश्वस्तांस व शिरडीसंस्थान कमिटीस इष्ट नसल्यामुळें त्यावर दोघांनीं मुंबई हायकोर्टांत अनुक्रमें ता. १-८-३० व २-८-३० रोजीं रिव्हिजन् अर्ज दाखल केले. त्या अर्जांचें काम आण्णाचे विश्वस्तांतर्फे बडोद्याचे माजी हायकोर्ट जज्ज श्रीयुत रामदत्त विठोबा देसाई ॲडव्होकेट मुंबई हायकोर्ट व शिर्डी संस्थानतर्फे श्रीयुत बाळाजी गणपतराव ॲडव्होकेट मुंबई हायकोर्ट या उभयतांनीं कांहींएक मोबदला न घेतां आनंदानें व अंतःकरणपूर्वक चालविलें होतें; त्याबद्दल अण्णा चिंचणीकरांचे विश्वस्त व शिर्डी संस्थानचें कार्यकारी मंडळ त्यांचे फार आभारी आहेत. नामदार हायकोर्टानें डिस्ट्रिक्ट कोर्टानें केलेला हुकूम ता. रोजीं रद्द केला. परंतु खर्चाबद्दल हुकुम करण्याकरतां तें काम फिरून ठाणें डिस्ट्रिक्ट कोर्टांत पाठविलें आहे. त्या कामाचा आद्यापि निकाल लागला नाहीं. तो लागल्यावर त्या सर्व कामाबद्दल सविस्तर हकीकत श्रीसाइलीलेच्या एखाद्या अंकीं पुढें प्रसिद्ध करण्यांत येईल.

९. श्रीयुत आण्णांचे मिळकतीपैकीं वेढे गांवचे जमिनीबद्दलची हकीकत श्रीसाइलीलेच्या ६ व्या वर्षाच्या ८-९-१० या जोडअंकांत पूर्वीच दिली

आहे. त्यापुढील हकी न म्हणजे कै. आत्माराम अनंत यांचे चिरंजीव व नातू यांचे कबज्यांतून ती जमीन घेण्याकरतां त्यांच्यावर डहाणू सब-जज्ज कोर्टांत लाविलेला दावा ही होय. हा दावा ता. १-३२ रोजीं डहाणू सब-जज्ज कोर्टांतील वकील श्रीयुत रघुनाथ आत्माराम करंदीकर यांच्यामार्फत दिला आहे. दाव्याचा निकाल लागल्यावर त्यासंबंधीं सविस्तर हकीकत श्रीसाईलीलेच्या एखाद्या अंकीं भक्तमंडळाच्या माहितीकरितां प्रसिद्ध करण्यांत येईल.

१०. श्रींचे मंदिरापुढील सभामंडपाकरतां संस्थान कमिटीकडून भगीरथ प्रयत्न चालू आहेत.

११. श्रींचे समाधी-दर्शन घेण्याकरितां येणाऱ्या भक्तवृंदांची समाधान-कारक सोय करण्याची खटपट चालू आहे.

१२. संस्थानचा द्रव्यनिधी वाढविण्याकरितां जे अनेक उपाय चालू आहेत त्यांपैकीं एकाचें अवलंबन करून ललितकलादर्श मंडळीचे उदार व सत्वशील मालक श्रीयुत व्यंकटेश बळवंत पेंढारकर यांच्याकडून "भक्तांचा गुलाम" नांवाचें नाटक घेऊन त्याचा प्रयोग ता. २-२-३२ रोजीं रात्रौ मुंबई एल्फिन्स्टन थिएटरांत करून त्यांतून मिळणाऱ्या रकमेनें अंशतः संस्थान निधिवर्धनाचा या सालीं प्रयत्न केला आहे. यासंबंधीं सविस्तर अहवाल श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध केला जाईल.

१३. कै. आण्णा चिंचकर यांच्या मिळकतीपैकीं नेवाळे गांवच्या जमिनीचें दोन वर्षांचें उत्पन्न अद्यापपावेतों मिळालें नाहीं. त्याबद्दल वसुलाचें काम चालू आहे.

१४. या वर्षी पूर्वीपासून उत्सवकार्यांच्या वेळीं भासत असलेली मोठ्या तांब्या पितळेच्या भांड्यांची उणीव रु. ३१६ ची भांडीं खरेदी करून दूर केली आहे.

१५. कै. श्रीयुत काकासाहेब दीक्षीत यांनीं शिरडी येथील आपल्या वाड्याचा जो भाग बाबांच्या भक्तांच्या उतरण्याच्या सोईकरतां म्हणून संस्थान कमिटीच्या ताब्यांत दिला होता, तो व त्याशेजारीज राहिलेला सर्व भाग म्हणजे सर्व वाडा या वर्षी काकासाहेबांचे चिरंजीव श्रीयुत रामकृष्ण हरी उर्फ बाबूराव दीक्षीत यांनीं संस्थान कमिटीच्या ताब्यांत दिला आहे. तो कमिटीनें ताब्यांत घेऊन त्याची थोडीशी दुरुस्ती करून भक्तांना उतरण्याकरतां राखून ठेविलेला भाग खेरीज करून बाकी शिल्लक राहिलेल्या भागापैकीं कांहीं भाग श्रीयुत माधवराव बलवंत देशपांडे यांना राहण्याकरितां भाड्यानें देऊन त्यांची एक-वर्षाची भाडेचिठी करून घेतली आहे. पूर्वीप्रमाणें सर्व वाड्याची देखरेख करण्याबद्दल माधवरावांना विनंती केली आहे, व त्यांनींही देखरेख करण्याचें कृपेनें कबूल केलें आहे.

१६. सालमजकुरीं श्रीसाईबाबांचा श्रीरामनवमीचा उत्सव व गुरुपौर्णिमेचा, गोकुळअष्टमीची व पुण्यतिथीचे उत्सव नेहमींप्रमाणें साजरे करण्यांत आले. या सर्व उत्सवांची पूर्ण हकीगत साईलीलेंत प्रसिद्ध झालेली आहे.

१७. या अहवालाचे वर्षी एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट घडून आलेली आहे ती अशीं कीं मद्रास जिल्ह्यांतील गुंटकलनिवासी श्रीयुत आत्माराम लाडोबा आरोळकर हे एक मराठे जातीचे सद्गृहस्थ असून त्यांच्यावर श्रीबाबांनीं अनुग्रह केला असल्यामुळें ते बाबांचे पूर्ण व निस्सीम भक्त बनले आहेत. त्यांनीं त्या भागांत बाबांच्या संबंधानें फार जागृती केली आहे, व त्यांत श्रीयुत अबदुल हकसारखे सुस्वभावी मुसलमान सद्गृहस्थही सामील झाले आहेत. राजश्री आरोळकर व त्यांच्या कुटुंबाची मंडळी गेल्या पुण्यतिथीच्या व रामनवमीच्या उत्सवास या वर्षी शिरडीस आली होती. यांच्यामार्फत दावणगिरीचे शेट श्रीयुत मुंदरजी चन्नाप्पा यांनीं ३०० रुपये संस्थानच्या कायमनिधीस देणगी म्हणून दिली. राजश्री आरोळकर हे इतक्यावरच स्वस्थ न बसतां त्यांचे जामात श्रीयुत जयराम पांडुरंग वाक्कर जे कराचीस राहतात ते व त्यांचें कुटुंब सौ. वत्सलाबाई वाक्कर यांच्यामार्फत कराचीस एक श्रीधाम

सेवामंडळ स्थापन करून कै. भक्तश्रेष्ठ आण्णासाहेब दाभोळकरकृत श्रीसाइ सच्चरिताचा सप्ताह करून अत्यंत उत्साहानें तेथें श्रीसाइबाबांची सेवा चालविली आहे.

त्याचप्रमाणें यंदाच्या रामनवमीच्या उत्सवांत दुसरी एक विशेष गो अशी दिसून आली कीं, सांवतवाडीचें श्रीयुत बापूसाहेब भाऊसाहेब पाटणकर त्यांचे मुसलमान सद्गृहस्थ स्नेही मेहेरवान शहाराजगुरु हे आपल्या कुटुंबांतील मंडळीसह त्यांचा कांहीं नवस फेडण्याकरितां मुद्दाम सांवतवाडीहून खास मोट करून प्रखर उन्हाळयाचे दिवस असतांही साडेतीन दिवसांच्या कंटाळवाण प्रवासाचे श्रम सोसून शिरडीस श्रीबाबांच्या पुण्यसमाधी चरणाजवळ आले हो भक्तीभावानें नवस फेडून, एकदोन दिवस तेथें राहून श्रीचरणांचें मनमुर दर्शन घेऊन नंतर ते सांवतवाडीस परत गेले.

कुठें गुंटकल, कुठें कराची, कुठें सांवतवाडी व कुठें शिरडी !!! क दात्मे बाबा कोणाच्या नवसास पावतात, को...वर अनुग्रह करतात व कोणा मनांत कशी प्रेरणा करतात, ही त्यां...ा लीला त्यांनाच ठाऊक !

## द्रुतविलंबित

मन रमो नेरमो कविकामिनी ।
कविपदीं त्रिपदीं जग-मोहिनी ।
सुमति दे मति दे मज विश्वपे ।
प्रजननी जननी सुगुरुकृपे ॥

१ नम्र होवो नरम होवो. २ आदिपुरुष परमात्मा. ३ संकटसमयीं. ४ ... चांद, मोक्ष देणारी. ५ त्रिभुवनाचे पालन करणारे. ६ विशिष्ट दया किंवा ... कणारी. ७ माउली.

तिरोभूत झाल्यामुळें विश्वाभास व प्रादुर्भूत झाल्यामुळें विश्वाभाव ( विश्व अभाव ) दाखविणाऱ्या कलानिपुण ऐंद्रजालिक ( गारुडी ) विश्वरंग-भूमीवर याप्रमाणें अहोरात्र दृष्टिबंधाचा ( नजरबंदीचा ) खेळ करून त्यापासून अलिप्त असणारे मंगलधाम श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबांच्या पवित्र गुरुकृपा चरण-पुष्करीं वरप्रमाणें प्रार्थना व अनंत साष्टांग प्रणिपात करून हा अहवाल संपवितो.

शिरडी, १७ जुलै १९३२.

**बाळकृष्ण विश्वनाथ देव,**
संतचरणरज दासानुदास श्री साई-
बाबा शिरडी संस्थानचे एक विश्वस्त.

आ. चिटणीस,
**सुंदरराव दिनानाथ नवलकर,**
श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी.

श्री. दासगणूकृत

# श्री संतकथामृत

## अध्याय २ रा

श्रीगणेशायनमः ॥ हे सिंदुरारे गजानना । गौरीपुत्रा विद्याधरा । महामंगळ शारदारमणा । ग्रंथ रचाया द्यावा वर ॥ १ ॥ हे आदिअनादि अनंता । सर्वव्यापका मायातीता ॥ दासगणूच्या धरुनी हाता । ग्रंथलेखन करवावें ॥ २ ॥ जेविं मागें राक्षसांनीं । त्रासविली मेदिनी । तर्‍हीं अव-तीर्ण चक्रपाणी । होऊनि असुर संहारिले ॥ ३ ॥ तैसेच या कलि-युगांत । शालीवाहन शके तेराशांत । हें महापुनीत आर्यावर्त । व्यापिलेंसे अविंधांनीं ॥ ४ ॥ जे अविंध महाक्रूर । जेविं डोम्याफणीवर । वळकावूनि हस्तनापूर । गादी आपुली स्थापिली ॥ ५ ॥ त्यांच्या मनीं हांव ऐसी । कीं बाटवावें हिंदूंसी । यवन करोनी अवघ्यांसी । महमदी धर्म स्थापावा ॥ ६ ॥ धेनु मारिल्या अगणित । भ्रष्ट केलीं पुण्यक्षेत्र । ब्राह्मण क्षत्री रजपुत । असंख्य ज्यांनी बाटविले ॥ ७ ॥ यज्ञयाग भजनपूजन । बंद झालीं भीती करून । सच्चिदानंद नारायण । तेणें द्रवला मानसीं ॥ ८ ॥ आर्यधर्माच्या रक्षणासाठीं । उपाय योजी जगजेठी । आपुले भक्त उठाउठी । प्रेरिता झाला भूमीवर ॥ ९ ॥ राज्यक्रांती धर्मछलन । जेव्हां जेव्हां होय जाण । तेव्हां तेव्हां संतजन । जन्मते झाले भूमीवरी ॥ १० ॥ मागें हिरण्यकश्यपु हिरण्याक्ष । झाले जगत्रयासी अजिंक्य । तर्‍हीं प्रल्हाद बालक । जन्मला तन्नाशास्तव ॥ ११ ॥ रावण कुंभकर्णादि असुर । जैं माजले भूमीवर । तैं विभीषण अंगद वायुकुमर । सुग्रीव शबरी जन्मली ॥ १२ ॥ तैसे शिशुपाल वक्रदंत । केशीक चाणुर कंस सत्य । दुर्योधनादि कौरव समस्त । माजतां ऐसेच जाहले ॥ १३ ॥ किरीटी

भीम युधिष्ठिर । उद्धव सुदामा विदुर । भीष्म द्रोणादि अक्रूर । ...वत् भक्त जन्मले ॥ १४ ॥ जें जैनमत माजलें । दै.. आर्ये जैन झाले । वैदिक मता विघ्न आलें । तें घडलें ऐसेंच ॥ १५ ॥ कुमारीलभट्ट शंकराचार्य । हस्तामलक गुरुराय । धर्मरक्षण हें कार्य । करण्या जन्मले नृपीवरी ॥ १६ ॥ याच न्यायें करून ॥ धर्मछल करितां यवन । झाले भगवत्भक्त निर्माण । ईश्वराच्या आज्ञेनें ॥ १७ ॥ सोपान निवृत्ति ज्ञानेश्वर । नामा एकनाथ कवीर । तुकाराम रामदास थोर । वैष्णववीर जन्मले ॥ १८ ॥ त्याचपरी गुरुगोविंदजी । अवतरले जगामाजी । ज्यांनीं हरि ठेविला राजी । परिसा चरित्र तयाचें ॥ १९ ॥ श्रीगुरु-नानक म्हणूनी । झाले पंजाबांत महाज्ञानी । ज्यांच्या चरितालागुनी । मागें वर्णिलें महिपतीनें ॥ २० ॥ म्हणोन पुनरुक्ति तयाची । मी न करीं येथ साची । फक्त श्रीगुरुगोविंदजीची । कथा वर्णितों ये ठायीं ॥ २१ ॥ श्रीनानकाचे गादीवर । हिरे आठ बैसले थोर । नववा हा कोहिनूर । गुरुगोविंद नाम ज्याचें ॥ २२ ॥ तयांची ऐका नामावळी । सादर करितों येथें भली । जी सर्वांहून आगळी । आहे जगत्रयांत ॥ २३ ॥ गुरुनानक झाल्यावर । अंगद बैसलें गादीवर । अमरदास रामदास नंतर । अर्जुन देव चौथा हो ॥ २४ ॥ हरगोविंद हरराय । झाले महासमर्थ पाह्य । या हरराय देवें केलें काय । तें थोडें सांगतों ॥ २५ ॥ नामा आणि पत्याला । तेथील राजांच्या पूर्वजाला । याचाच आशीर्वाद झाला । नृपपदा पावले ते ॥ २६ ॥ हर-किसन त्यामागूनीं । बसले गादीवरी जाणीं । सदा रत नामस्मरणीं । सच्चिदानंद हरीच्या ॥ २७ ॥ यवनी अम्मल चहूंकडे । राष्ट्र झालें वापुडें । द्विजवरांचा तयांपुढें । उपाय कांहीं चालेना ॥ २८ ॥ ब्राह्मण राष्ट्राचे पुढारी । ब्राह्मण धर्माचे अधिकारी । चहूंवर्णांभीतरीं । अग्रस्थानें पावले ॥ २९ ॥ तयांलागीं स्वधर्मचिंता । लागलीसे तत्वतां । म्हणूं लागले हे अनंता । धर्म बुडूं पाहतो ॥ ३० ॥ सर्वधर्मीं आर्य धर्म । निर्मिला त्वां उत्तमोत्तम । तोच कां हे पुरुषोत्तम । बुडवूं पाहासी भूमंडळीं

॥ १३ ॥ भारत भागवत रामायण । जाळूं लागले दुष्ट यवन । सिखासूत्र तोडून । द्विजा वाटवूं लागले ॥ ३२ ॥ तुझ्यावांचून आतां कोणी । त्राता नसे चक्रपाणी । या यवनापासूनी । धर्म आमुचा रक्षावा ॥३३॥ पूर्वी शंखासुरें नेतां वेद । मच्छ झालासी तूं गोविंद । वेद आणूनियां आनंद । देता झालासी ब्राह्मणां ॥३४॥ तैसेंच आतां पुन्हां करीं । अवतार धरून श्रीहरी । धर्म आमचा भूवरी । देवा तुवां रक्षावा ॥ ३५ ॥ तें स्वप्नीं सांगे नारायण । अवघ्या द्विजांलागून । नका होऊं मनीं खिन्न । वचन ऐका हें माझें ॥ ३६ ॥ कलीचीण कलियुगांत । मी न अवतरें अनंत । परी माझे भगवद्भक्त । धर्मरक्षणा धाडितों ॥ ३७ ॥ सांप्रत नानकाचे गादीवरी । हरकिसन साक्षात्कारी । तेगबहादूर गादीवरी । येईल त्याच्या मागोनी ॥ ३८ ॥ तो आणि त्याचा पुत्र । भक्त माझे परम पवित्र । करुनी यवनांचें सत्र । वेदोक्त धर्म रक्षितील ॥ ३९ ॥ ऐसें बोलोनि नारायण । पावता झाला अंतर्धान । ब्राह्मणांसी समाधान झालें असें त्या योगें ॥ ४० ॥ आतां तेगबहादराची पूर्वकथा । तुम्ही ऐका हो तत्वतां । विठ्ठल अवत्रे वदविता । आहे माझा निश्चयें ॥४१॥ पूर्वी कुरुक्षेत्रांत । पंडुराजा महापुनीत । होऊन गेला विख्यात । कथा आहे भारती ॥४२॥ तो पंडु माद्रीसहीत । तया गेला काननांत । त्या काननीं होता करित । तप तेजःपुंज ऋषी ॥ ४३ ॥ हाच पुढें भूवावर जन्म पावला शिघोर । नाम तेगबहादर । लाधतें झालें तयाला ॥ ४४ ॥ असो हा तेजःपुंज ऋषी । तप आचरी काननासी । करून पर्णकुटीसी आनंदानें राहिला ॥ ४५ ॥ तें अरण्य महाघोर । नाना जाती तरुवर पर्वतांचीं शिखरें थोर । नभोमंडळा भेदिती ॥४६॥ तेजःपुंज फलाहारी ऊर्ध्वरेत साक्षात्कारी । योगमार्गांत अधिकारी । असे शंकरासमान ॥ ४७ ॥ त्या वनीं जगज्जननी । आदिमाया प्रणवरूपिणी । अष्टभुज नारायणी । येती झाली असुरभयें ॥ ४८ ॥ मागें लागले असुर । वक्र सुवल महाक्रूर । नयन जेवीं खदिरांगार । भालीं सिंदुर चर्चिला ॥ ४९ जिव्हा ळळळळे बाहेर । दांत दाढा भयंकर । आयुधानें मंडित कर

धाविन्नले देवीवरी ॥ ५० ॥ साठ पद्म सेना सांगातीं । घेऊन आले पापमती । लागले पाठीं निश्चिती । आदिमाया भवानीच्या ॥५१॥ मुखें गर्जना घोरकरीती । उभी चामुंडे रहा म्हणती । पूर्णी शत्रूंना दाखविती । तं न शूर म्हणावे ॥ ५२ ॥ त्वां मार्दिले चंडमुंड । महिषासुर प्रचंड । डळमळविलें ब्रह्मांड । त्याची प्रचीती पाहूं दे ॥ ५३ ॥ एका क्षणांत तुजलागूनी । पाठवूं आह्मी यमसदनीं । कशाची तूं भवानी । म्याड आहेस निश्चयें ॥ ५४ ॥ उगीच तुझे पवाडे । माजले जगीं चहूंकडे । परी आतां उमगलें कोडें । अर्थ नव्यान ह्मणोनी ॥ ५५ ॥ असा ऐकोनि देवी आश्रमांत । येऊन आपुले जोडी हात । त्या तेजःपुंज ऋषींप्रत । रक्षण व्हावें म्हणूनी ॥ ५६ ॥ देवी म्हणे हे मुनिवरा । महाप्रज्ञा गुणसागरा । ध्यावें मशीं अभयकरा । शरण आलें मी तुला ॥ ५७ ॥ मागें लागले बल सुबल । महा दुरात्मे दुर्जन खल । आता तव पदीं ठविलें भाल । रक्षण करीं मुनिवर्या ॥ ५८ ॥ तें ऋषी म्हणती तथास्तु । निर्भय राहें भवानी तूं । म्यां जाणिला सर्व हेतु । तुझ्या मनींचा मातोश्री ॥ ५९ ॥ देवीस घातिलें पाठीशीं । तों बल सुबल आले आश्रमासीं । दटावूनि पुसती मुनींसी । कोठें दुर्गादेवी वद ॥ ६० ॥ ती शिरली तव आश्रमांत । जैसी चपला मेघगर्भांत । चमकोनियां होय गुप्त । तैसी येथें जाहली ती ॥ ६१ ॥ तिची शुद्धि आम्हांप्रत । त्वां सांगणें अति त्वरित । ना तरी आम्हीं प्राणांत । करूं तुझा निश्चयें ॥ ६२ ॥ त्यांशीं न देतां प्रत्युत्तर । तेजःपुंज उठला सत्वर । घेवोनी करीं व्याघ्रांबर । द्वाराबाहेर पातला ॥ ६३ ॥ मुनी व्याघ्रांबर झटकितां । दुष्टदमन प्रगटला तत्वतां । केवढी मुनींची अगाध सत्ता । तें अवघें तपोबल ॥६४॥ त्या व्याघ्रांबरावरीं । जितके रोम होते निर्धारीं । त्यांपासून भूवरी । एकेक व्याघ्र प्रगटला ॥ ६५ ॥ दुष्टदमन जोडी हात । मशीं निर्मिलें कीनिमित्त । हें सांगा सर्व सत्य । सेवे तत्पर असें मी ॥६६॥ तेजःपुंज म्हणे हे कुमारा । तूं मर्दिता होय असुरां । या बलसुबलांसी यमपुरा । पाठवावें शीघ्रगती ॥ ६७ ॥ तेणें होशील कृतार्थ ।

आदिमाया भेटेल सत्य । हे कुमारा तुजप्रत । वेळ उगा करूं नको ॥ ६८ ॥ हे व्याघ्र अवघे तुझें सैन्य । त्यांच्या साह्यें करून । असुरांचे घ्यावे प्राण । तोषवाया देवीसी ॥ ६९ ॥ ऐशी आज्ञा होतांक्षणीं । दुष्टदमन लागून चरणीं । खवळला जैसा मलयाग्नी । वलावरी धांविन्नला ॥ ७० ॥ उभा उभा रे चांडाळा । महा दुष्टा दुर्जना खला । एका क्षणांत तुजला । पाठवीन मी यमसदनीं ॥ ७१ ॥ ऐसें ऐकोनि तद्भाषण । वल सुवल खवळले जाण । धनु ओढोनी आकर्ण । बाण सोडूं लागले ॥ ७२ ॥ वर्षाकालीं जलधारा । मेघ वर्षती एकसरा । तैसी शर-वृष्टी करुनी धारा । दुष्टदमना वेढिलें ॥ ७३ ॥ तें प्रकटोनी भवानी । महाशक्ति नारायणी । पाठीस उभी राहूनि । बोलली त्या दुष्टदमना ॥ ७४ ॥ ध्यांत न भ्यावें हे कुमारा । हे घे त्रिटक गदा वागुरा । हा बाण भाता खरा । अर्पितें मी तुजलागीं ॥ ७५ ॥ साह्य होतां मृडानी । आनंदला कुमार मनीं । अवघीं शस्त्रें घेवोनी अतित्वेषें सरसावला ॥ ७६ ॥ जैसा सिंह मृगावरी । किंवा वज्र पर्वत शिरीं । किंवा सुवेळीं रावणारि । तैसा शोभला कुमार ॥ ७७ ॥ अगणित जरी फणीवर । परि गरुड करी संहार । तैसाच हा कुमार । वधित झाला तयांतें ॥७८॥ साठ पद्म त्यांचें सैन्य । व्याघ्रें भक्षिलें न लागत क्षण । अशुद्धाचे प्रवाह जाण । वाहूं लागले ते ठायीं ॥ ७९ ॥ मासांच तो झाला चिखल । धरणीस पडले वल सुवल ॥ विजया देवीनें जगमाळ [illegible] वरली ॥ ८० ॥ विमानीं दाटले सुरवर । करूं लागे जयजयकार । दुंदुभीचे ध्वनी गंभीर । काढूं लागले दिवौकस ॥ ८१ पुष्पवृष्टि वरच्यावरी । करिती दुष्टदमनावरी । इकडे अष्टभुजा ईश्वरी प्रसन्न झाली तयाला ॥ ८२ ॥ ह्मणे वत्सा मागें वर । अपेक्षित मझडकर । वल सुवल महाक्रूर । मर्दिलें त्वां ये ठायीं ॥ ८३ ॥ ऐके देवीचें भाषण । तेजःपुंज दुष्टदमन । बोलते झाले कर जोडोन । त श्रीजगदंबेस ॥ ८४॥ आम्हांसीं देई ऐसा वर । अमोलिक सौख्यकर वास वैकुंठीं निर्धार । व्हावा आमुचा सर्वदा ॥ ८५ ॥ ज्या वैकुंठवार

साठीं । मुनी करिती खटपटी । त्या मुक्तीच्या बैसवी हाटीं । आम्हालागीं जगदंबे ॥ ८६ ॥ नको नको हें जन्ममरण । नको नको देह धारण । हेंचि मागणें तुजलागून । तें तूं द्यावें शीघ्रगती ॥ ८७ ॥ ऐसी ऐकोनी तदोक्ती । बोलली अंबा तयांप्रती । देणें मुक्ति तुम्हांप्रती । नाहीं मशीं अशक्य ॥ ८८ ॥ परि बापा कलियुगांत । यवन छळतील हिंदूमत । तेव्हां त्यांच्या रक्षणार्थ । धाडणें आहे तुम्हांतें ॥ ८९ ॥ कां कीं हा वेदोक्त धर्म । सर्व धर्मां अत्युत्तम । जेवीं देवांत पुरुषोत्तम । किंवा वसंत ऋतुमध्यें ॥ ९० ॥ या धर्माच्या संरक्षणा । जे जे झगडतील जागा । ते ते प्रिय नारायणा । होतील आगळे प्राणाहून ॥९१॥ धर्मार्थ युद्ध करण्याची । जेव्हां पाळी येत साची । तेव्हां दाटी विमानांची । होत अंतरिक्षांत ॥ ९२ ॥ धर्मासाठीं ज्यांचे प्राण । होतील धारातीर्थी अर्पण । मुक्तिमाळा त्यांलागून । घालील जाणा निश्चयें ॥ ९३ ॥ गत-प्राण वीरांसी ॥ देव वाहतील विमानासी । करून त्यांना वंदनासी । आदर करिती तयांचा ॥ ९४ ॥ पंचमहापातकी नर । जरी असला पापागार । धर्मयुद्धीं निर्धार । पडतां मुक्ति पावेल ॥ ९५ ॥ ऐशी धर्म-युद्धाची महती । किती सांगूं तुम्हांप्रती । धर्मरक्षण जे करिती । तेच महात्मे जाणिजे ॥ ९६ ॥ स्वार्थासाठीं जे झगडती । ते अधोगतीस पावती । ती खचित होय अनीति । तें सहसा करूं नये ॥ ९७ ॥ धर्म-संस्थापकाहून । धर्मरक्षक अधिक जाण । धर्मसंरक्षकासमान । कोणी नसे या जगतीं ॥९८॥ यासाठीं हे मुनिवरा । कलियुगीं धरुनि अवतारा । करीं यवनांच्या संहारा । धर्मरक्षणा कारणें ॥ ९९ ॥ तें कृत्य झाल्या पुरें । मुक्ति मिळेल तुम्हां बा रे । तुमचे अनुयायी लोक सारे । महा बलवान होतील ॥ १०० ॥ ऐकोन तिचें वचन । अवश्य म्हणती दोघे-जण । तुझ्या आज्ञेकरून । घेऊं अवतार कलियुगीं ॥ १०१ ॥ तो तेजःपुंज ऋषिवर । झाला तेगबहादर । बैसला नानकाचे गादीवर । कलियुगा माझारीं ॥ १०२ ॥ नामें गुजरी त्याची वधू । दुजी द्रौपदी वा कयाधू । महापतिव्रता अगाधू । झाली जाणा श्रोतेहो ॥ १०३ ॥

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—श्रीसाईलीला.

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीं किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसि न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवा

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत प अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला क विल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत प.

प्रकाशक—श्रीसाईलीला.

"दक्षिणा प्राइज कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, ... व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय ... श्री दासगणू महाराज यांनीं ... व प्रोफेसर श्री. नो. नाफेकर, M. A., " यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन

श्री पासष्टी–भावार्थ दीपिका

... नरेंद्र बुक डेपो दादर, मुंबई येथें मिळेल.

...पर्डी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.

सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी

नकलेबद्दल ] ब्राह्मी तेल [ सावध राहावें.

बाळबाळंतिणीकरितां औषधें

बाळंत काढा नं. १ पहिल्या दहा दिवसांचा ०१४; बाळंत काढा नं. २ दहा दिवसानंतर ०१४; बाळकडूः—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०८; कुमारी आसव लहान मुलांकरितां ०१२.

सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १८१० ) द्राक्षासव ( अर्धा रत्तल ०१४
... रत्तल ०८ ट. ख. नं. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा कॅटलाग व प्रकृतिमान ... पाठविण्याकरितां "दंग–पत्रिका" ही सात आण्यांची तिकिटें आली असतां पाठवूं.

दत्तात्रय कृष्ण सांडु ब्रदर्स आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ × २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, मुंबई नं० २

पुणें:—श्री साईनाथ आणि कंपनी.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, २६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनीं छापून

...